


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६३० . वा | रविवार | दि. १७ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# शब्द न पाळल्यास जरांगेंसोबत आंदोलनात उतरणार बच्चू कडूंचा राज्य सरकारला इशारा...



वृत्तसंस्था/मुंबई

राज्य सरकारने शब्द पाळला नाही तर मी मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत आंदोलनात उतरणार, असा थेट इशाराच आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे. मनोज जरांगे यांनी दिलेली २४ तारीख जवळ येत आहे, १७ तारखेला जरांगे नवीन आंदोलनाची घोषणा करणार आहेत असेही ते म्हणाले. सरकारने मनोज जरांगे यांना आतापर्यंत शिंदे समितीने काय-काय काम केले त्याचा अहवाल द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. बच्चू कडू म्हणाले, अंतरवाली सराटीमध्ये लाठीचार्जच्या वेळी मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते, ते गुन्हे सरकारने मागे घ्यावेत. यासंदर्भात जरांगे यांना शब्द दिला आहे. त्यामुळे मी शब्दांचा पक्का आहे, नाहीतर मी जरांगे यांच्या आंदोलनात सहभागी होणार, असा शब्दांत त्यांनी सुनावले. दरम्यान, बच्चू कडू यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या वेळी राज्य सरकार आणि जरांगे यांच्यामध्ये मध्यस्ती करून जरांगे यांच्या आंदोलन थांबवले होते. त्यानंतर जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारला २४ डिसेंबर पर्यंत मुदत दिली होती. मराठ्यांना सरसकट कुणबी सर्टिफिकेट द्यावे, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. त्या मागणीला आमदार बच्चू कडूंनीही पाठिंबा दिला आहे.

# अखेर मुख्यमंत्री, मंत्रीही आता लोकायुक्तच्या कक्षेत, नेत्यांच्या चौकशीचा मार्ग मोकळा



वृत्तसंस्था/ नागपूर

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींचा समावेश करत विधान परिषदेने महाराष्ट्र लोकायुक्त विधेयकाला वर्षभरानंतर शुक्रवारी मंजुरी दिली. त्यामुळे आता भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या नेतेमंडळींची चौकशी करणे शक्य होणार असून मुख्यमंत्री, मंत्री व आमदारही या कायद्याच्या कक्षेत येणार आहेत. गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनातच हे विधेयक विधानसभेत मंजूर झाले होते. तब्बल वर्षभरानंतर ते विधान परिषदेत मंजूर करण्यात आले. १९७१च्या लोकायुक्त कायद्याची जागा आता हा नवा कायदा घेईल. यात भ्रष्टाचारविरोधी कायद्याचा समावेश असेल. लोकप्रतिनिधींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी भ्रष्टाचारविरोधी कायद्याव्यतिरिक्त काही निराळ्या तरतुदींचा समावेश या विधेयकात करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधान परिषदेत दिली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केलेल्या मागणीनुसार लोकायुक्त कायद्याचा मसुदा तयार झाला होता. हा मसुदा विधानसभेत मंजूर करण्यात आला होता. विधान परिषदेत हे विधेयक आल्यानंतर यात सदस्यांच्या सूचनांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या लोकप्रतिनिधी, अधिकारी यांची चौकशी या माध्यमातून करता येणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.लोकायुक्त म्हणून उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश असतील. त्यांची नेमणूक मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते, विधानसभा व विधान परिषदेचे सभापती करणार आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले. या कायद्यात मुख्यमंत्री किंवा माजी मुख्यमंत्री यांच्या विरोधातील तक्रारीची चौकशी करायची असल्यास विधानसभेच्या दोन तृतीयांश सदस्यांची मान्यता लागेल. मंत्री किंवा माजी मंत्र्याच्या विरोधातील चौकशीला राज्यपाल आणि मंत्रिगटाची परवानगी लागेल. तर, विधानसभा आमदार व माजी आमदाराच्या चौकशीला विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषदेच्या सदस्याच्या चौकशीला सभापतींची संमती असणे अनिवार्य राहणार आहे. तक्रार खोटी आढळल्यास अशा व्यक्तीच्या विरोधात खटला दाखल करण्याची तरतूदही कायद्यात करण्यात आली आहे, असेही फडणवीस म्हणाले.

# लहुजी विद्रोही सेना आयोजित आरक्षणाचे वर्गीकरण अ ब क ड करा

## महाक्रांती धरणे आंदोलन सहभागी होण्याचे लहुजी विद्रोही सेनेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष लहुश्री.रुपेश भाऊ अवचार यांचे आवाहन



जनसंचलन/बुलढाणा

लहुजी विद्रोही सेना आयोजित आरक्षणाचे वर्गीकरण अ ब क ड करा महाक्रांती धरणे आंदोलन सहभागी होण्याचे लहुजी विद्रोही सेनेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष लहुश्री.रुपेश भाऊ अवचार यांचे आवाहन मातंग समाजाच्या विविध मागण्यासाठी लहुजी विद्रोही सेनेच्या वतीने नागपुर येथे १८ डिसेंबर २०२३रोजी यशवंत स्टेडीयम येथे महाक्रांती धरणे आंदोलन विधानभवनावर धडकणार आहे तरी मातंग समाज बांधवानी हजारोच्या सख्येने सहभागी व्हावे व सकाळी ११ वाजता यशवंत स्टेडीयम नागपुर येथे उपस्थीत राहावे असे आवाहन लहुजी विद्रोही सेनेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष लहुश्री रुपेश भाऊ अवचार यांनी केले आहे

# दोन ठिकाणी मटका पकडला...

जनसंचलन/ खामगाव

शहरातील बर्ड प्लॉट भागात गुरुवारी दुपारी १२:४० वाजताच्या सुमारास मस्तान चौकातील जुना फैलात वरली मटका खेळवणाऱ्या आरोपीवर अपर पोलिस अधीक्षकांच्या पथकाने कारवाई केली. यावेळी आरोपी रिहान अहमद मो. अन्सार (३०) रा. जुनाफैल हा वरली मटका खेळताना व खेळविताना आढळून आला. पोलिसांनी त्याचे जवळून रोख व वरली मटका साहित्य असा एकूण १ हजार ८३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर दुसऱ्या घटनेत सुनील गजानन खंडारे (२४) रा. शिवाजीफैल हा वरली मटका खेळताना व खेळविताना आढळन आला

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विकसित भारत संकल्प यात्रेतून शासकीय योजनांचा जागर...

## शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचे आवाहन



**जनसंचलन/बुलढाणा**

देशातील युवाशक्तीला पुढे आणण्याच्या दृष्टिकोनातून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांना रोजगार देण्याचे काम केल्या जात आहे. त्यासाठी केंद्र सरकार विविध शासकीय योजना राबवित आहे. युवक तसेच नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केंद्रीय रोजगार, श्रम, वन, हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी आज चिखली तालुक्यातील पेठ येथे केले. जिल्ह्यात केंद्र शासनाच्या विकसित भारत संकल्प यात्रेचा प्रसिद्धीरथ शासकीय योजनांची जनजागृती करत असून, आज १६ डिसेंबरला ही यात्रा बुलढाणा जिल्ह्यातील पेठ गावात पोचली. दुपारी ४ वाजता ग्रामीण जनतेला उद्देशून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या एलईडी व्हँनवरून दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे संबोधित केले. या कार्यक्रमाला केंद्रीय श्रम, रोजगार, वन, हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव उपस्थित होते. यावेळी त्यांच्यासोबत केंद्रीय माहिती संवाद तंत्रज्ञान समितीचे अध्यक्ष खासदार प्रतापराव जाधव आमदार श्वेताताई महाले आमदार अँड. आकाश फुंडकर,माजी आमदार विजयराज शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते, अपर जिल्हाधिकारी सुनील विंचनकर उपस्थित होते. यावेळी केंद्राच्या योजनेची माहिती केंद्रीय मंत्री श्री. यादव यांनी देऊन ग्रामीण भागातील जनतेशी त्यांनी प्रत्यक्ष संवाद साधला. देशातील अन्नदात्या शेतकऱ्याला सुखी संपन्न करण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि बी-बियाणे निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. यातून अन्नधान्य उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांना फायदा होईल, असा आशावाद ही केंद्रीय मंत्री श्री. यादव यांनी व्यक्त केला. ज्या लाभार्थ्यांना अद्याप लाभ मिळाला नाही, अशांना लाभार्थ्यांना तात्काळ मंत्री महोदयांच्या हस्ते योजनांचा देण्यात आला. केंद्र शासनाच्यावतीने विविध लोकाभिमुख योजनांची यशस्वी अंमलबजावणी केली जात आहे. लक्ष्यीत लाभार्थी या योजनांपासुन वंचित राहु नये, यासाठी केंद्र शासनाने या यात्रेला सुरुवात केली. आजच्या संकल्प यात्रेच्या कार्यक्रमात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.


# पहुरजिरा येथे दोन गटात तुफान हाणामारी; ५ जणांवर गुन्हा...



**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव पहूरजिरा येथे शुल्लक कारणावरून दोन गटात काल सायंकाळी वाद होऊन हाणामारी झाली. याप्रकरणी परस्पर विरोधी तक्रारीवरून ५ जणाविरुद्ध विविध कलमानुसार जलंब पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हे दाखल केले आहे. याबाबत विष्णु पांडुरंग चव्हाण वय ३८ वर्षे रा. मोरगाव डी यांनी जलंब पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, मोटर सायकलने घरी येत असतांना यातील सचिन सुडोकार याने माझ्या मोटर सायकलला कट मारला त्यावरुन त्यास म्हणावयास गेले असता संजय वाशीमकार, महादेव वाशीमकार, सचिन सुडोकार, नितीन सुडोकार सर्व रा. पहूरजिरा यांनी वाद घालून मला जातीवाचक शिविगाळ केली. मोटर सायकलने समोर गेली असता चौघांनी रस्त्यात मोटर सायकल समोर मोटर सायकल आडवी लावून मला लाथा बुक्यानी तसेच काठीने मारहाण करुन जातीवाचक व अश्लील शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. अशा तक्रारीवरून जलब पोलिसांनी उपरोक्त चौघांविरुद्ध कलम ३२४, ३२३, ३४१, २७९, २९४, ५०६, ३४, भादवी सहकलम ३ (१) (आर) (एस) ३ (२) (त) अ.जा.ज.प्र.कायदा नुसार गुन्हा दाखल केला आहे. तर याबाबत सौ. रेखा रामदास वशीमकार (५०) रा. पहुरजीरा यांनी तक्रार दिली की, काल खामगाव येथून बाज़ार करून येत असताना माझा मुलगा संजय हा बाजार करुन त्याच्या मोटरसायकलवर येत असताना खामगांव येथील जीएस कॉलेज येथे विष्णु पांडुरंग चव्हाण शिक्षक हा भेटला व मुलाला म्हटला कि तुझे आई वडील काही तुझे लग्न करत नाही तुला तसेच राहाव लागेल. यावेळी माझा मुलगा म्हणाला की ते माझे आई वडील पाहतील तु कशाला काळजी करतो दरम्यान तो मित्राबरोबर बोलत उभा राहीला तेवढ्यात विष्णु चव्हाण हा आला व त्याने त्याची मोटर सायकल उभी करून गाडीवरुन उतरला व माझ्या मुलाची गच्ची धरली व अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. अशा तक्रारीवरून जलंब पोलिसांनी विष्णु पांडुरंग चव्हाण रा. मोरगाव डी याच्या विरुद्ध कलम २९४, ३२३, ५०४, ५०६, भादवी गुन्हा दाखल केला आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विशेष आर्थिक पॅकेज द्यावे- खासदार प्रतापराव जाधव



**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यात अवकाळी पावसाच्या कचाट्यात हजारो शेतकरी सापडले आहेत. अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस झाला आहे. मात्र यातून अनेक मंडळे सुटली आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ पासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी विशेष आर्थिक पॅकेज उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी कलम ३७७ अन्वये लोकसभेत जिल्ह्याचे भूमिपुत्र खासदार प्रतापराव जाधव यांनी शासनाकडे केली आहे. जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे जिल्ह्यातील तब्बल २ लाख ३४ हजार २७५ शेतकऱ्यांचे जवळपास ११३ कोटी १२ लाख तीस हजार रुपयांच्या पिकांचे नुकसान झाले आहे या अवकाळी पावसाचा तब्बल १ लाख २८ हजार २०० हेक्टर ला फटका बसला आहे. २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान प्रामुख्याने सिंदखेड राजा देऊळगाव राजा लोणार तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले असून ९२ महसूल मंडळापैकी ३४ महसूल मंडळे ३७इ प्रभावित झाली आहेत. यात प्रामुख्याने शेती पिके फळपिके पशुधनाची मोठी हानी झाली आहे. या नुकसानाचा महसूल व कृषी विभागाच्या वतीने पंचनामा करण्यात आलेत. यामध्ये ११३ कोटी १२ लाख ३० हजार रुपयाच्या निधीची मागणी शासन स्तरावर करण्यात आली आहे. या अवकाळी पावसामुळे २७५४ शेतकऱ्यांच्या ४२४ हेक्टर बीजोत्पादन क्षेत्रावरील ३८४१ शेडनेटचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान ५०२ गुरे व १०४ घराचे अंशतः नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाती येणारे कापूस, हरभरा, गहू, फळबाग आधीच पूर्णपणे नष्ट झाली आहे. जिल्ह्यातील जळगांव जामोद, संग्रामपूर, शेगाव तालुक्यात देखील याचा भयंकर फटका बसलेला आहे. सदर परिस्थितीला राष्ट्रीय आपदा श्रेणीमध्ये नोंद करून शेतकऱ्यांना विशेष आर्थिक पॅकेज उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी यावेळी खासदार प्रतापराव जाधव यांनी केली.

# वीजचोरी करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल...

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव घारोड येथे आकोडा टाकून विजेची चोरी करणाऱ्या एका महिलेवर शहर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. याबाबत सहाय्यक अभियंता, खामगाव ग्रामीणचे रविंद्र जुमळे हे विजचोरी शोध मोहीमे अंतर्गत घारोड येथे गेले असता कमलाबाई महादेव हतागळे वय ५१ वर्षे रा. घारोड या महिलेने घरात काळ्या रंगाच्या डब्लू. पी.टी. सी. सर्व्हिस वायरद्वारे घराजवळ असलेल्या लघुदाब विद्युत वाहिनीवर आकोडा टाकून विजेची चोरी केल्याचे दिसून आले. मागील १२ महिन्यात १३२ युनिटची एकूण ६३७४ रुपयाची वीजचोरी केली. अशा तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसांनी कमलाबाई महादेव हतागळे या महिलेविरुद्ध कलम १३५ भारतीय विद्युत कायदा २००३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# देशी दारुची वाहतूक करणाऱ्यावर गुन्हा



**जनसंचलन/ शेगाव**

येथील जि.प.शाळेसमोरून श्रीकृष्ण उर्फ चेतन बळीराम ढगे वय ३० वर्षे रा. जवळा प. हा दुचाकीने देशी दारू घेऊन जात असतांना १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० ते ८ वा.च्या दरम्यान पोलिसांना मिळून आला. त्याचे जवळून देशी दारूच्या ९० मिलीच्या १५ सिलबंद शिश्या, रोख, दुचाकी, मोबाईल व थैली सह एकूण ३३ हजार ४१० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोकॉ. योगेश जाधव यांनी ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरुध्द मदाका कलम ६५ (ई) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा ते शिरपूर जनता बस सुरू करा- अनिल वाघमारे यांची मागणी



**जनसंचलन/बुलढाणा**

शिरपूर येथे शासनाने ब दर्जा प्राप्त केलेले शेषराव महाराज व्यसनमुक्ती संस्थान असून येथे महाराष्ट्रातील बाहेरगावावरून येणाऱ्या हजारो नागरिकांची वर्दळ असते. तसेच गाव-ातील विद्यार्थी उच्च व उच्च माध्यमिक शिक्षणासाठी ,अनेक वृद्ध अपंग व इतर कामगार लोक मोठ्या संख्येने दररोज बुलढाणा येथे जात येत असतात .शिरपूर ते बुलढाणा दरम्यान केळवद ,अंत्रीतेली ,साखळी येळगाव, सव इत्यादी गावातील नागरिक ,विद्या-र्थी या बसने प्रवास करतात त्यामुळे बसचे उत्पन्न सुद्धा चांगले आहे. सद्यस्थितीत बसच्या फक्त दोनच फेऱ्या चालू आहेत त्या कधी येतात तर कधी येत नाहीत त्यामुळे प्रवास करणाऱ्या नागरिकांची व विद्यार्थी यांची अत्यंत गैरस होत आहे. याबाबतीत आगर व्यवस्थापक साहेब यांना अनेक वेळा ग्रामपंचायतचे ठराव व निवेदन देण्यात आले आहेत तरीसुद्धा आद्यपर्यंत सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही. नागरिकांच्या प्रवासाबाबत आगार व्यवस्थापक साहेब वेळोवेळी याप्रकरणी दुर्लक्ष करत आहेत. जर याबाबतीत लवकर निर्णय घेतला नाही तर आगार व्यवस्थापक यांच्या विरोधात सर्व प्रवाशी व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. निवेदनावर मनोज पवार शहर अध्यक्ष ,विजय पडोळ ता.उपाध्यक्ष, योगेश विसप-ुते युवा नेते ,राहुल चौधरी म.न.वी. से. ता.अध्यक्ष ,देवराज मानमोडे ,अमोल येसकर, विकास शेळके,दीपक वाघमारे इत्यादीच्या सह्या आहेत.

# वाघजाळ येथे दरोडेखोरांचा धुमाकूळ, दांपत्याला केली मारहाण...

## रोख रकमेसह दागिने केले लंपास...

**जनसंचलन/मोताळा**

तालुक्यातील वाघजाळ गावात काल मध्यरात्री, चार दरोडेखोरांनी धुमाकूळ घालत घरातील लोकांना मारहाण करत, रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची खळबळ जनक घटना उघडकीस आली आहे, दरम्यान घटनेनंतर वरिष्ठ पोलीस अधिकारी व श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे, मोताळा तालुक्यातील वाघजाळ फाट्यापासून अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या वाघजाळ या गावांमध्ये,१५ डिसेंबरच्या रात्री १ ते १.३० वाजेच्या सुमारास,चार दरोडेखोरांनी आजुबाजुच्या परिसरातील दरवाजाच्या कडी-कोंडा लावून, सागर शिंबरे यांच्या घराच्या समोरील दरवाजाची कडी लावून, घराच्या मागील दरवाजाची कडी तोडून घरामध्ये प्रवेश केला.व घरातील सागर किसना शिंबरे वय ३५, सौ. सोनल सागर शिंबरे वय ३०, व सार्थक सागर शिंबरे वय १२ यांना स्पींकलरच्या नळ्यांनी बांधून लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. या मारहाणीमध्ये सोनल



शिंबरे यांचा हात फॅक्चर झाला,तर सागर शिंबरे यांचा पाय फॅक्चर झाला. दरोडेखोरांनी सोनल शिंबरे यांच्या अंगावरील व कपाटातील सोन्याचे दा-गीणे, व नगदी १७ हजार ५०० रुपये असा एकूण ९० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केले आहे, घटनेची माहिती मिळताच बोराखेडी पोलिसांनी रात्रीच घटनास्थळी धाव घेवून, गंभीर जखमी झालेल्या सागर शिंबरे व सोनल शिंबरे यांना, बुलढाणा येथील डॉ. भवटे यांच्या हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल केले होते,सोनल यांच्या हा-तावर तर सागरच्या पायावर प्लॅस्टर करुन घरी आणण्यात आले आहे, तर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी, घटनास्थळी श्वानपथकातील राणीला आणले, मात्र चोरट्यांनी कोणत्याही प्रकारचे पुरावे सोडले नसल्याने,श्वान राणीला चोरट्याचा माग घेता आला नसल्याचे समजते, दरम्यान पोलिसांनी वाघजाळ फाटा व परिसरातील सीसीटीव्ही तपास-ुन तपास सुरु केला आहे.दरम्यान या घटनेमुळे वाघजाळसह परिसरामध्ये मोठी दहशत पसरली असून,पोलिसांना दरोडेखोरांना पकडण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

# नागपूर विधानसभेवर १८ डिसेंबरला भूमिहीन,अतिक्रतीत शेतमजूर कर्जदाराचा भूमिहक्क कर्जमुक्ति सत्याग्रह मोर्चा...

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य शासनाकडे सतत ३० वर्षापासुन वन व महसुल भुमिह क्क व भूहिनांची १००% कर्जमुक्ति जिं-गाव पेनटाकळी खडकपूर्णा प्रकल्प ग्रस्त अतिक्रमणधारकांच्या व जिल्हा प्रशासन स्तरिय मागण्यासाठी मराठवाडा विदर्भ खान्देशातील संघटनेच्या प्रलंबीत मागण्यासाठी सततच्या लढ्याची दखल विद्यमान सरकारने न घेतल्याने शास-नाने नागपूर हिवाळी अधिवशनात भूमि मुक्ति मोर्चा व बहुजन मुक्ती मोर्चा महाराष्ट्र संयुक्त संघटनेच्या मागण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी तात्काळ करावी यासाठी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाई प्रदीप अंभोरे संयुक्त संघटना प्रमुख यांचे प्रमुख नेतृत्वात भाई भिमराव खरात (प्रदेशाध्यक्ष) दिनकर घेवंदे (प्रदेश कार्याध्यक्ष) भाई बाबुराव सरदार (राज्य प्रवक्ता) भगवान गवई (मराठवाडा प्रदेशाध्यक्ष) अंबादास वानखेडे (जेष्ठ नेते) रमेश गाडेकर (विदर्भ प्रमुख) अश-ोक इंगळे,प्रकाश वानखेडे (उत्तर महाराष्ट्र प्रमुख) मधूकर मिसाळ अ.वि.प्रमुख,मुन्ना पराते,दिलीप रामटेकर (नागपुर विभाग) प्रमोद पोहेकर,प्यारसिंग पॉवरा,जुलमाबाई पवार (जळगांव खा) आदिच्या प्रमुख उपस्थितीत दलित अदिवासी भुमिहीनांना वन व महसुल जमीन कायम पट्टे व निवासी घराचे पट्टे भुमिहीनाचे कर्जमुक्ती,स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मीती, मातृतिर्थ



बुलडाणा जिल्हाचे सभाव्य विभाजनात बुलडाणा जिल्हाचे मा.जिजाऊ नगर स्वतंत्र जिल्हा नामांतर घोषणा करा व विभाजीत मा जिजाऊ नगर जिल्हा स्वतंत्र उदयनगर तालुका घोषणा करा., आत्महत्या ग्रस्त व अन्याय ग्रस्त शेतकरी शेतमंजुराना आर्थिक मदत, जिगांव प्रकल्प बांधित शेकडो कुंटुंबाना अतिक्रमीत जमीन व निवासी अतिक्रण घराचा एक रक्मी १० लक्ष रुपये आर्थिक मोबदला व पुनरवर्सन लाभ देण्यात यावा रमाई व अन्य घरकुल योजना लाभ १.२० लक्ष वरुन २.५ लक्ष करण्यात यावा अतिक्रमण धारकाचे ताब्यातील शेतीवर शासनाने सौरऊर्जा प्रकल्प राबवितांना त्याचे पात्र अपात्र निश्चित होई पर्यंत संभाव्य प्रकल्पास स्थगीती द्यावी.बुलडाणा जिल्हा सह राज्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीग्रस्तांना पिक नुकसान भरपाई तात्काळ वाटप करा. यासह विविध मागण्यासाठी यशवंत स्टेडियम नागपुर येथुन निघणाऱ्या भूमिहक्क व कर्जमुक्ति सत्याग्रह मोर्चास बुलडाणा जळगांव,औरंगाबाद,अकोला जिल्हातील अतिक्रमीत जमीन धारकांनी आपल्या नजीकच्या भुसावळ,मलकापुर, नादुरा,शेगांव,अकोला रेल्वे स्थानकांवरुन हजारोच्या सख्येने उपस्थितीत राहण्यासाठी प्रस्थान करावे असे आवाहन संघटनेचे जिल्हानेते भरत मुंडे ईलियासभाई पठाण गजानन जाधव,अनिस खान पठाण,यांनी एका प्रसिध्द पत्रकाद्वारे केले आहे.

# विभागीय आयुक्तांकडून मतदार यादी नमुन्यांची तपासणी...

**जनसंचलन/ खामगाव**

मतदार याद्यांचा संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात निरीक्षणाची जबाबदारी असलेल्या विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे यांनी शुक्रवारी खामगाव येथे भेट देत विविध मुद्यांची माहिती घेतली. खामगाव विधानसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयास दुसऱ्यांदा भेट दिली. त्यांनी याप्रसंगी पातूर येथील साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा मंडळ यांचे सर्व कलाकार यांनी वासुदेव व इतर पारंपरिक वेशभूषेमध्ये मतदार नोंदणी मतदार जागृती याबाबत पथनाट्याद्वारे जनजागृती केली. खामगावातील केला हिंदी विद्यालय, नॅशनल हायस्कूल, जी.व्ही. मेहता माध्यमिक विद्यालय, सहकार महर्षी भास्करराव शिं-गणे महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी रॅली काढली. रॅलीला डॉ. पाण्डेय यांनी हिरवी झेंडी दाखवली. विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थिनींनी रांगोळी स्पर्धांमध्ये भाग घेतला. त्या रांगोळ्यांचे निरीक्षणही त्यांनी केले. त्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या मुलींना प्रमाणपत्राचे वाटप केले. सध्या भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ईव्हीएम व्हीव्हीपॅटबाबत मतदारांमध्ये जागृती करण्याचे काम सुरू आहे. तह-सील कार्यालयात असलेल्या स्टॅटिक टीमद्वारे सुरू असलेल्या प्रात्यक्षिकाची पाहणी केली. त्याठिकाणी उपस्थित महिलांना ईव्हीएमबाबत माहिती दिली. मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्यासाठीमतदारांनी भरलेल्या फॉर्म नंबर सहा तसेच नाव करण्याबाबत भरलेल्या फॉर्म नंबर सातची नमुना तपासणी त्यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, तहसीलदार अतुल पाटोळे, गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपुत, माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी, मुख्याधिकारी शे-ळके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल धारावीतील मोर्चातून सरकारला इशारा...

## धारावीसाठी संघर्षाची ही सुरुवात असल्याचं ठाकरेंचं वक्तव्य...



**वृत्तसंस्था/मुंबई**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मोर्चा धारावीत पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी धारावीच्या पुनर्विकासाचं काम अदानींना दिल्याच्या मुद्यावरुन हल्लाबोल केला. उद्धव ठाकरेंनी जमललेल्या धारावी, मुंबई आणि महाराष्ट्रप्रेमींचा धारावीसाठी संघर्ष सुरु आहे, असं म्हटलं. आज मुंबईतील मोजके कार्यकर्ते रस्त्यावर आलेलो आहोत. अदानींची दलाली घेतलीय त्या सुपारीबाजांना सांगतोय की हा आडकित्ता पाहा किती मोठा आहे. पन्नास खोके कमी पडायला लागली म्हणून धारावी आणि मुंबई गिळायला निघालेले आहेत, अशी टीका ठाकरेंनी केली. राज्यातील सरकार अदानीच्या दारी आहे. धारावीतील सर्व गोष्टींचा टीडीआर अदानींना देऊन टाकला आहे. सब भूमी अदानी की होऊ देणार नाही, असंही ठाकरे म्हणाले. अडीच वर्ष यशस्वीपणे चालणारं सरकार गद्दारी करुन कुणी पाडलं हे तुमच्या लक्षात आलेलं असेल. गुवाहाटीला जाण्यासाठी विमानं कुणी पुरवली असतील, हे लक्षात आलेलं असेल. उद्धव ठाकरे सत्तेवर आहेत तोपर्यंत मुंबई गिळता येणार हे लक्षात आल्यानं सरकार पाडलं की काय असं वाटू लागलंय, असं उद्धव ठाकरे म्हणाले. २०१८ चा विषय काढतात पण जे पाप असेल ते देवेंद्र फडणवीस यांचं असेल. धारावीत सरकारी कर्मचारी वसाहत होती.वांद्रे वसाहतीतील सरकारी कर्मचाऱ्यांना तिथल्या तिथं घरं देण्याचा निर्णय आमच्या सरकारनं घेतला होता. अदानींना धारावी, विमानतळ, नवी मुंबईतील विमानतळ, रेक्लेमेशन अदानींना दिलं जात आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. धारावीतील पात्र आणि अपात्र ठरवणारी पात्र कोणती आहेत, असं उद्धव ठाकरे म्हणाले. करोनाशी लढून जिंकणारी धारावी अदानीला शरण जाईल का? असा सवाल उद्धव ठाकरे म्हणाले. आता हे अपात्र आहेत त्यांना मिठागरात टाकणार म्हणजे तिथली जागा देखील अदानींना दिली जाईल. मिठागर पण अदानींना देऊन टाकताय का? असा सवाल ठाकरेंनी केला.धारावीकरांना ५०० चौरस फुटाचं घर मिळालं पाहिजे. धारावीकरांना धारावीत घरं मिळाली पाहिजेत. धारावीचा विकास सरकारनं केला पाहिजे. अदानींना ज्या सवलती दिल्या त्या इतर कोणत्या बिल्डरला दिल्या आहेत, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केलामुंबई महापालिकेच्या निवडणुका घेत नाहीत. विधानसभेत आम्ही सत्तेत आल्यानंतर अदानींचं काय करायचं ते बघून घेऊ, असं उद्धव ठाकरे म्हणाले. घराला घर दिल्याशिवाय धारावीकरांना धक्का लागता कामा नये. आज धारावीच्या लढ्याची सांगता नसून लढ्याची सुरुवात आहे. पोलिसांनी पण सरकार येतं आणि जातं याची देखील नोंद घ्यावी, असं उद्धव ठाकरे म्हणाले.मी प्रकल्पाच्या विरोधात नाही, धारावीकर पिढ्यानं पिढ्या राहात आहेत तिथं अदानींनी एक दिवस राहून दाखवावं, असं आव्हान उद्धव ठाकरे म्हणाले.

## सोयाबीन-कापूस उत्पादकांचा इंगा काय असतो हे सरकारला १९ डिसेंबरला नागपूरात दाखवू - रविकांत तुपकर..

**जनसंचलन/बुलढाणा**

सोयाबीन-कापूस उत्पादकांच्या मागण्यांबाबत केंद्र व राज्य सरकारने दिलेल्या शब्दांच्या अंमलबजावणीला सुरुवात न केल्याने रविकांत तुपकरांकडून पुन्हा एकदा आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे येलो मोझॅक,बोंडअळी व पावसात खंड पडल्याने झालेल्या नुकसानीपोटी १००% नुकसान भरपाई मिळावी, सोयाबीन-कापसाला दरवाढ मिळावी, पिकविम्याची १००% फायनल रक्कम लवकर मिळावी, यासह अन्य मागण्यांसाठी रविकांत तुपकरांच्या नेतृत्वाखाली गेल्या २ महिन्यांपासून सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला आहे, एल्गार रथयात्रा, २० नोव्हेंबर रोजी बुलढाण्यात झालेला एल्गार महामोर्चा, सोमठाणा येथे रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन व मुंबईत मंत्रालय ताब्यात घेण्यासाठी हजारो शेतकऱ्यांनी दिलेली धडक यामुळे राज्य सरकारने २९ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांशी चर्चा केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चेत बहुतांश मागण्या त्यांनी मान्य केल्या.तसेच सोयाबीन-कापूस दरवाढीसंदर्भात केंद्रीय



वाणिज्यमंत्री ना.पियूषजी गोयल व उपमुख्यमंत्री.देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ९ डिसेंबर रोजी बैठक झाली. काही गोष्टींसाठी सरकार सकारात्मक असल्याचे बैठकीत केंद्रीय मंत्री गोयलांनी सांगितले होते. मात्र मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सरकारला १५ डिसेंबर पर्यंतची मुदत दिली होती. सरकारला दिलेल्या शब्दाची आठवण करून देण्यासाठी नागपूर अधिवेशनावर हल्लाबोल आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यानुसार १८ डिसेंबर रोजी समृद्धी महामार्गावरील मेहकर जवळील फरदापूर टोल येथून शेतकरी नागपूरच्या दिशेने रवाना होतील व १९ डिसेंबर रोजी अधिवेशनावर हल्लाबोल आंदोलन करणार आहेत. सोयाबीन-कापूस उत्पादकांचा इंगा काय असतो हे सरकारला १९ डिसेंबरला नागपूरात दाखवू, असा इशारा यावेळी रविकांत तुपकरांनी दिला आहे.

# त्या मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवा नाव न घेता-अंबादास दानवे इशारा...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

विधान परिषदेत अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी सभागृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित असताना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांचे नाव न घेता त्यांना मराठा आरक्षण प्रश्नावरून लक्ष्य केले. ङ्गसरकारमधील मंत्रीच आरक्षणावरून दोन समाजात दरी निर्माण करण्याचे काम करीत आहे. अशा मंत्र्यांना थांबवा किंवा त्यांना मंत्रिमंडळातून बाहेरचा रस्ता दाखवा,फ अशी मागणी दानवे यांनी या वेळी केली.

मराठा आरक्षणावरून एकतमताने ठराव करून सरकारने तो केंद्राला पाठवला असताना यावर चर्चा घेण्याचा उद्देश काय, असा प्रश्नही दानवेंनी उपस्थित केला. ङ्गमराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. ओबीसींना धक्का न लावता ते दिले गेले पाहिजे, अशीच सर्वांची भूमिका आहे. असे असताना मराठ्यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र सरसकट मिळाले पाहिजे, यावरून मंत्रिमंडळातील नेत्यांमध्ये मतभेद आहेत,फ असे सांगत मराठा



समाजाला आरक्षण देण्यापेक्षा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आरक्षण कसे दिले, याची तळी उचलण्यात सत्ताधारी पक्षातील आमदारांनी भाषण केले, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधारी पक्षातील आमदारांवर निशाणा साधला. मराठा आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन केले नसते आणि लाठीचार्ज झाला नसता तर हा मुद्दा ऐरणीवर आला असता का, असा सवालदेखील दानवे यांनी उपस्थित केला. या वेळी दानवे यांनी, ङ्गमुख्यमंत्री मंत्रिमंडळात एक भूमिका मांडतात आणि काही त्यांचे मंत्री विविध ठिकाणी सभा घेऊन आणि सभागृहातही वेगळी भूमिका मांडून ते त्या समाजाचे मसिहा आहेत अशी प्रतिमा निर्माण करतात. ते मराठा समाजाच्या आरक्षणाविरोधात अत्यंत खालच्या स्तरावर टीका करतात. स्वतःचे महत्त्व व राजकीय अस्तित्व दाखविण्यासाठी अशा भूमिका घेतात अशी शंका राज्यातील जनतेच्या मनात आहे,फ असा आरोप भुजबळ यांच्यावर त्यांचे नाव न घेता केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | Rates | Height | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/-<br>15 Day=3500/-<br>7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

### One Day

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Rate | Height | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी

केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाउंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस

फक्त ५०० रुपये

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com